प्रश्न १. अ ) खालील गणिते सोडवा व पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा. गुण ६

१. एका वर्गातील ४४ मुले सहलीला जाण्यासाठी तयार आहेत. त्यांना नेण्यासाठी वाहने बोलावली आहेत. एका वाहनात १० मुले बसू शकतात. तर अशी किती वाहने सर्व विद्यार्थ्यांसाठी लागतील?

| |
|---|
| एकूण ५ वाहने लागतील. |

२. पाण्याच्या एकूण ८ बाटल्या आहेत. प्रत्येक बाटलीमध्ये ३/४ पाणी भरले आहे. हे सगळे पाणी एका भांड्यात ओतून पुन्हा बाटल्या पाण्याने पूर्ण भरायच्या असतील तर त्यासाठी किती बाटल्या लागतील?

| |
|---|
| ६ बाटल्या लागतील. |

३. रोहनला पुस्तकाची १५ पाने वाचायला २० मिनीटे लागतात. पूर्ण पुस्तक वाचायला त्याला दोन तास २० मिनिटे लागली. तर त्या पुस्तकामध्ये एकूण किती पाने होती?

| |
|---|
| पुस्तकामध्ये एकूण १०५ पाने होती. |

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न.१. ब) खाली कंसात दिलेले ५ अंक वापरुन कोणत्याही २ संख्या बनवा. गुण ४

तुम्ही तयार केलेली ५ अंकी संख्या खालील रकान्यामध्ये अंकात आणि शब्दात लिहा.

**( ८, ३, ४, २, ५)**

| संख्या | अंकात | शब्दात |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |

प्रश्न करा.२ अ ) कंसातील योग्य शब्द निवडून गाळलेल्या जागी भरा. गुण ५

१. मकर संक्रांतीला लहान मुलांना <u>हलव्याचे</u> दागिने घालतात.

( फुलांचे , हलव्याचे, सोन्याचे )

२. समर्थ रामदास <u>सज्जनगड</u> या ठिकाणी राहत होते.

( सज्जनगड, पुणे , सिंहगड )

३. पांडव हे <u>पाच</u> भाऊ होते.

( आठ , दोन, पाच )

४. जलमार्गावरील वाहतुकीसाठी <u>जहाजाचा</u> वापर केला जातो .

(जहाजाचा , विमानाचा, आगगाडीचा )

५. <u>अंडी</u> ( हिरव्या पालेभाज्या, मिठाई , अंडी )

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न क्र. २ ब) कंसातील शब्द निवडून विरुद्धार्थी शब्द रकान्यात लिहा. गुण ५

(पांढरेशुभ्र , सोपे, गडद, उष्ण , मूर्ख, फायदा, लवकर, अंधार , नवीन, शाकाहारी )

| | |
|---|---|
| काळेकुट्ट x पांढरेशुभ्र | सावकाश x लवकर |
| थंड x उष्ण | उजेड x अंधार |
| जुने x नवीन | फिका x गडद |
| कठीण x सोपे | मांसाहारी x शाकाहारी |
| हुशार x मूर्ख | नुकसान x फायदा |

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न क्र. ३(अ) खालील कोणत्याही एका विषयावर ५-६ वाक्यांत चिठ्ठी लिहा. गुण ५

मित्र/ मैत्रिणीला स्लीपओव्हर चे आमंत्रण.

किंवा

मित्राकडे /मैत्रिणीकडे खेळायला जात आहे अशी पालकांना चिठ्ठी लिहा.

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न क्र. ३ (ब) खालील क्रियापदांचा काळ ओळखा व योग्य रकान्यात ✔ अशी खूण करा. गुण ५

| क्रियापदे | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| उदाहरण: घाबरला | | ✔ | |
| जिंकतील | | | ✔ |
| बघितला | | ✔ | |
| वाचेन | | | ✔ |
| करते | ✔ | | |
| पडशील | | | ✔ |
| गेले | | ✔ | |
| देते | ✔ | | |
| खाईन | | | ✔ |
| विसरली | | ✔ | |
| उडाले | | ✔ | |

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

क्र. ४ (अ) खालील चित्राचे ५-६ वाक्यांत वर्णन करा. गुण ५




Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न क्र.४ (ब) खाली दिलेले चित्र बघा व ५-६ वाक्यात वृत्तपत्र बातमी लिहा. गुण ५



Argentina won FIFA world cup 2022

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न क्र. ५ (अ) खालील शब्दाचे लिंग ओळखा व चूक ❌ किंवा बरोबर ✔️ लिहा.

गुण २.५

| | |
|---|---|
| वाटी - स्त्रीलिंगी ✔️ | वेळ - स्त्रीलिंगी ✔️ |
| पोशाख - स्त्रीलिंगी ❌ | भाषा - नपुसकलिंगी ❌ |
| पाखरू - नपुसकलिंगी ✔️ | गाणे - पुल्लिंगी ❌ |

प्रश्न क्र. ५ (ब) खालील वाक्ये वाचून योग्य वचनाभोवती गोल करा. गुण २.५

१. दुकानात वेगवेगळ्या __भाज्या___ विकायला ठेवल्या होत्या. ( भाजे / भाज्या )
२. वाचनालयातून मी काही _पुस्तके____ आणली आहेत. ( पुस्तके / पुस्तक )
३. रस्त्याच्या बाजूने सुंदर __डोंगर___ होते. ( डोंगरी / डोंगर )
४. मला मैदानावर निरनिराळे __खेळ___ खेळायला आवडतात. ( खेळी / खेळ )
५. आईने मला गरमागरम ___बटाटेवडा__ आणून दिला. ( बटाटेवडा / बटाटेवडे )

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न क्र. ५ (क) खालील अक्षरांची फोड करून लिहा.** **गुण २.५**

**उदाहरण: श्रीखंड - (श् + री) +खं +ड**

१. प्रत्यक्ष - (प् +र) + (त्+ य् ) +क्ष

२. अत्तर - अ +(त् +त ) +र

३. स्पर्धा - ( स् +प + र् )+ धा

४. झिम्बाब्वे - झि + (म् +बा ) + (ब् +वे )

५. पराक्रम - प +रा + (क् +र )+म

**प्रश्न क्र. ५ (ड ) खालील वाक्यांतील क्रियाविशेषाणांभोवती गोल करा.** **गुण २.५**

उदाहरण: मी दररोज खेळायला जातो.

१. रस्त्याने जाताना सावकाश चालावे.

२. काल रात्री सतत पाऊस पडत होता.

३. रूपाली खूप गोड गाते.

४. अनिश शाळेतून उशिरा घरी आला.

५. आजी नेहमी खाऊ आणते.

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न क्र.६ (अ ) खालील वाक्यांतील अव्ययांना गोल करा. गुण ५

१. आम्ही झाडाखाली बसून जेवण केले.

२. अबब! केवढा मोठा हा धबधबा.

३. जेव्हा बाबा बाजारात जातात तेव्हा ते मला पण घेऊन जातात.

४. पूर्वाच्या पायाला दुखापत झाली म्हणून ती शर्यतीत पळू शकली नाही.

५. आजोबांनी मला आणि ताईला काही पुस्तके शिवाय रंगपेटी पण दिली.

प्रश्न क्र. ६ (ब) पुढील वाक्ये वाचून बरोबर ✔️ किंवा चूक ❌ अशी खूण करा.
गुण २.५

१. रोज गोड पदार्थ खाणे शरीरासाठी चांगले असते. - ❌

२. गहू हे कडधान्य आहे. - ❌

३. शाकाहारी जेवणात भाज्यांचा जास्त वापर केला जातो. - ✔️

४. फळांमधून शरीराला जीवनसत्त्वे ( Vitamins) मिळतात. - ✔️

५. लवंग , मिरे , वेलदोडा हे मसाल्यांमध्ये वापरले जात नाहीत. - ❌

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न क्र. ६ (क) कंसातील योग्य शब्द निवडून गाळलेल्या जागी भरा. गुण २.५

१. असंख्य तारे मिळून अवकाशात जो समूह बनतो त्याला <u>आकाशगंगा</u> म्हणतात.

(आकाशगंगा , उल्का , धूमकेतू )

२. भारताच्या दक्षिणेला <u>हिंदी महासागर</u> आहे.

(हिमालय पर्वत , हिंदी महासागर, अरबी समुद्र )

३. स्वातंत्र्यवीर सावरकर हे एक <u>क्रांतीकारक</u> म्हणून जगाला जास्त ओळखीचे आहेत.

( शिक्षक , डॉक्टर , क्रांतीकारक)

४. भारताचे राष्ट्रीय फळ <u>आंबा</u> आहे.

( आंबा , पेरू, सफरचंद )

५. <u>सूर्य</u> हा जलचक्राचा प्रमुख घटक आहे.

( चंद्र , सूर्य , वारा )

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न क्र. ७ (अ) खाली दिलेले शब्दगट वापरुन त्या संदर्भात ( **context)** प्रत्येकी एक वाक्य बनवा. गुण ५

उदाहरण: दिल्ली , भारत - दिल्ली भारताची राजधानी आहे.

१. गुरु ग्रह , सूर्यमाला - गुरु हा सूर्यमालेतील सर्वात मोठा ग्रह आहे.

२. जयोस्तुते , सावरकर - जयोस्तुते हे काव्य सावरकरांनी लिहिले आहे.

३. संक्रांत , तिळगूळ - संक्रांतीला एकमेकांना तिळगूळ दिला जातो.

४. अर्जुन , द्रोणाचार्य - द्रोणाचार्य हे अर्जुनाचे गुरु होते.

५. कारखाना , प्रदूषण - कारखान्यांमधून निघणाऱ्या धुरामुळे प्रदूषण होते.

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न क्र. ७ (ब ) खालील संवाद वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. गुण ५**

सान्वी - नाशिक हे किती छान आणि मोठे शहर आहे, मला नाशिकमध्ये फिरायची खूप उत्सुकता आहे.
सुनीत - खरंच ! तुला माहितेय का महाराष्ट्रातील सगळ्यात मोठ्या नदीच्या काठी हे वसलेलं आहे. सांग बरं , त्या नदीचे नाव.
सान्वी - मला माहीत आहे. महाराष्ट्रातील सर्वात मोठी नदी ही गोदावरी आहे. तिला नाशिकमध्ये “गंगा “ असं संबोधलं जातं.
बाबा - बरोब्बर! आणि इथली द्राक्षे पण खूप प्रसिद्ध आहेत बरं का !
सुनीत - जशी आपल्या नागपूरची संत्री प्रसिद्ध आहेत.
बाबा - सान्वी, उद्या आपण कुठे जाणार आहोत माहितेय का?
सान्वी - मला मॉल मध्ये खरेदीला जायला आवडेल.
बाबा - नाही. आपण उद्या नाशिकमधील जुन्या पुरातन देवळांना भेट द्यायला जाणार आहोत. तुम्हाला दोघांना नक्कीच तिथे खूप आवडेल.
सान्वी - हो बाबा, मला खूप आवडेल तिथे जायला. आपण सगळे मिळून नाशिकमध्ये छान फिरुया.

१. नाशिक हे शहर कोणत्या नदीच्या काठी वसलेलं आहे?

__नाशिक शहर गोदावरी नदीच्या काठी वसले आहे.

२. नाशिकचे कोणते फळ प्रसिद्ध आहे?

नाशिकची द्राक्षे प्रसिद्ध आहेत.

३. सान्वीला कुठे जायला आवडले असते?

सान्वीला मॉलमध्ये खरेदीला जायला आवडले असते.

४. बाबा सगळ्यांना कुठे घेऊन जाणार आहेत?

बाबा सगळ्यांना नाशिकमधील जुनी व पुरातन देवळे बघायला नेणार आहेत.

५. महाराष्ट्रातील ३ मोठ्या शहरांची नावे लिहा. (नाशिक आणि नागपूर सोडून )

पुणे , औरंगाबाद , मुंबई

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न क्र. ८ (अ) खालील उताऱ्याचे इंग्रजीत भाषान्तर करा. गुण ५

पाणी ही आपल्याला निसर्गाकडून मिळालेली भेट आहे. आपल्या रोजच्या कामांसाठी , कारखान्यांना, तसेच शेतीसाठी पाण्याची गरज असते. प्रदूषणामुळे पाऊस कमी पडतो आणि दुष्काळ पडतो. म्हणून आपण प्रदूषण कमी करून पावसाचे पाणी योग्य प्रकारे साठवले पाहिजे. पाणी अतिशय मौल्यवान आहे व ते आपण जपून वापरले पाहिजे.

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न क्र. ८ (ब)** खालील उताऱ्याचे मराठीत भाषान्तर करा. गुण ५

Last week, me and my friend went to the beach. We had lots of fun there and played many games. We started off by swimming in the ocean. Next, we played tag in the sand. We built a big sand castle. Lastly , we watched a beautiful sunset and went home.

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.